| MHBI100023002022 | **<u>नियमीत दिवाणी दावा क्रमांक ५२७/२०२२ मधील निशाणी क्र.२८ वरील आदेश</u>** |
|---|---|

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्याविरुध्द कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] प्रतिवादीचे क्र. ४ व ५ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ५ चा हिचा पती व एकुलता एक मुलगा हे ऑगस्ट २०२२ मध्ये विहीरत पडून मयत झालेले आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ ची मानसिक अवस्था ही ठिक नाही व ती सतत आजारी असते. त्यामुळे तिला काही महत्वाची व आवश्यक कागदपत्रे मिळालेली नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ व ५ मुदतीमध्ये लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत. प्रकरण स्थावर मिळकतीसंबंधी असल्याने त्यामध्ये त्यांचे हक्क गुंतलेले आहेत. सदरचा विलंब माफ न झाल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल.

[०३] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करत, दिलेले कारण संयुक्तीक नसल्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली.

[०४] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०६] प्रस्तुतचा दावा हा वाटणी करुन वेगळा ताबा मिळणेबाबत दाखल केलेला आहे. समन्सची बजावणी झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रतिवादीने कैफियत दाखल करणे अपेक्षित होते. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ व ५ यांच्या विरुध्द विना कैफियत दि.२६.०६.२०२३ रोजी निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना कैफियत दाखल करण्यास २ महिने १ दिवसाचा विलंब झालेला आहे. परंतू दाव्याचा योग्य न्यायनिवाडा होण्याकरीता प्रतिवादी क्र.४ व ५ ची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना लेखी कैफियत दाखल करण्यास

झालेला विलंब माफ करणे गरजेचे वाटते. कारण असे झाल्यास त्यांची लेखी कैफियत त्यांना दाखल करता येईल व तो दावा निकाली लावण्याकरीता गरजेचे आहे. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना कैफियत सादर करण्यास २ महिने १ दिवसाचा उशीर झालेला असुन वेळेत कैफियत सादर न केल्यामुळे त्यांच्याविरुध्द प्रस्तुत दावा विना कैफियत चालविण्यात आलेला आहे. मात्र आज रोजी पावेतो प्रस्तुतच्या दाव्याची सुनावणी सुरु झालेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. एकुणच वरील कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

(१) अर्ज रक्कम रुपये १००/– च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

(२) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांना लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब रद्द करण्यात येत असुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

(३) प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २००/– वादीस देण्यात यावी.

(४) प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी सोसावा.

सही/–
(ए.टी. जगताप)
दिनांक:– १७.०२.२०२४.
३ रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

| | |
|---|---|
| Dictated on | : 17.02.2024 |
| Transcribed on | : 17.02.2024 |
| Checked & signed on | : 17.02.2024 |

Sd/-

(S.Y. Gore),
Stenographer Grade-3,
Ct. of CJJD and JMFC, Kaij.